# BDP / BCA / BTS

# मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

## सत्रांत परीक्षा

## जून, 2022

## पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01

*वेळ : दोन तास* *अधिकतम गुण : 50*

***सूचना : सर्व*** *प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.*

**1.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : *10*

(क) कोरोना साथीचे थैमान

(ख) देशातील धरणांचे महत्त्व

(ग) आरोग्य हीच खरी संपत्ती

(घ) मला आवडलेले पुस्तक

**2.** खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : *8*

(क) तुकाराम महाराज साधु-संतांचे अंत:करण कसे असते म्हणतात ?

(ख) कवी हा अलौकिक सृष्टीचा निर्माता आहे असे केशवसुत का म्हणतात ?

(ग) 'नव्या मनूतिल गिरिधर पुतळा' ह्या कवितेतून यंत्रयुगाची कृत्रिमता मर्ढेकर कशी व्यक्त करतात ?

(घ) 'कातरवेळ' या कथेत आक्का मावशीच्या घरी जेवायला गेल्यावर मावशी आणि तिच्या यजमानांनी तिला कशी वागणूक दिली ?

**3.** खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे लिहा : *6*

(क) 'वळीव' या कथेत तात्या देसायाला झालेल्या उन्हाच्या त्रासाचे वर्णन कसे केले आहे ?

(ख) प्रल्हाद बहिणीच्या घरी थेट न जाता मरिआईच्या देवळात जाऊन का बसे ?

(ग) आकाशाशी नाते जोडल्यावर लेखकाला कोणता अनुभव आला ?

(घ) 'सांबर' एकांकिकेत वन्य जमातीतील नव्या पिढीतील मुले-मुली ही वेगळ्या जीवनमूल्यांनी कशी प्रेरित झालेली असतात ?

**4.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर टीपा लिहा : *6*

(क) 'गुंड्याभाऊचे दुखणे' या कथेतील प्रसंगनिष्ठ विनोद

(ख) वसतिगृहांचे शिक्षणक्षेत्रातील महत्त्व

(ग) नागरिकाला लाभणारे महत्त्वाचे अधिकार

(घ) बालगंधर्वांची गायकी

**5.** 'सकर्मक' क्रियापद आणि 'अकर्मक' क्रियापद म्हणजे काय ते सांगून त्यांचे प्रत्येकी एक-एक उदाहरण वाक्यात वापर करून लिहा. *5*

**किंवा**

खालीलपैकी ***एका*** कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळींत विस्तार करा : *5*

(क) ग्रंथ हेच गुरू

(ख) निंदकाचे घर असावे शेजारी

(ग) आडात नाही तर पोहोऱ्यात कुठून येणार !

**6.** खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : *3*

(क) जीव तीळ तीळ तुटणे

(ख) हबका बसणे

(ग) तिलांजली देणे

(घ) निगा राखणे

(ङ) तोंडचे पाणी पळणे

**किंवा**

खालीलपैकी ***तीन*** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा : *3*

(क) ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी

(ख) उद्योगाचे घरी ऋद्धी सिद्धी पाणी भरी

(ग) कुठे इंद्राचा ऐरावत, कुठे श्यामभटाची तट्टाणी

(घ) झाकली मूठ सव्वा लाखाची

(ङ) पी हळद नि हो गोरी

**7.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : *4*

(क) 'ललित वाङ्मयात ऐतिहासिक सत्य नसते पण तात्त्विक सत्य असते' असे ना.सी. फडके का म्हणतात ?

(ख) आंबेडकरांनी घटनेने मान्य केलेली कोणती मानवी मूल्ये सांगितली आहेत ?

(ग) शिक्षणामुळे समाजपरिवर्तन शक्य आहे, असे भाऊरावांनी का म्हटले आहे ?

(घ) भांडवलशाही समाजव्यवस्था स्त्रीला स्वातंत्र्य उपभोगू द्यायला असमर्थ आहे असे छाया दातार का म्हणतात ?

**8.** खालील इंग्लीश उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : *4*

The flowers that we see all around us are beautiful, beautiful is the rising of the morning sun, beautiful are the variegated hues of nature. The whole universe is beautiful and man has been enjoying it since his appearance on the Earth. Sublime and awe-inspiring are the mountains; the gigantic rushing rivers rolling towards the sea, the trackless deserts, the infinite ocean, the starry heavens — all these are beautiful indeed.

**9.** खालील उताऱ्याचा सारांश लिहा : *4*

ज्ञानभाषा एक आणि लोकभाषा दुसरी अशी हिंदुस्थानच्या जीवनाची परंपरागत कहाणी आहे. पूर्वी ऋषिमुनींची आणि पंडितांची ज्ञानभाषा संस्कृत होती तर जनसामान्यांची भाषा प्राकृत. पण नंतरही तेच झाले. मुसलमानी अंमलात ज्ञानभाषा उर्दू, फारसी वगैरे झाली. त्यानंतर इंग्रज आले आणि या देशातील ज्ञानभाषा इंग्रजी बनली. लोकभाषा अशा तऱ्हेने दुर्लक्षित राहिल्यावर लोक शहाणे होणार तरी कसे ? आता स्वातंत्र्यानंतर जेव्हा जनजीवन आम्हाला विकसित करावयाचे आहे, तेव्हाही लोकभाषा ही ज्ञानभाषा होणार नसेल तर ज्ञानभाषा हा ज्यांचा मक्ता होता त्यांचेच साम्राज्य

सांस्कृतिक जीवनामध्ये निर्माण होईल. ते होऊ दिल्यास आपले स्वत्व नष्ट होईल.

संस्कृतमधल्या ज्ञानाचा मक्ता सगळी विद्वान मंडळी घेऊन बसली होती. त्या विद्वानांच्या तावडीतून ज्ञानाला सोडवून मराठीत ज्ञानाचा पहिला वृक्ष ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' च्या रूपाने नेवाशाला लावला. महाराष्ट्राच्या इतिहासात लोकभाषेने ज्ञानभाषेचे पहिले पाऊल तेथे टाकले. परक्या लोकांच्या ग्रंथांचे मराठीत भाषांतर करून मराठी भाषा वाढेल असे नाही. मराठी भाषेने मराठी मनाचा कस घेऊनच वाढले पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने मराठी भाषा वाढेल, अधिकाधिक उत्कर्ष पावेल.